पिंपरी चिंचवड महानगरपालिका रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.५

सभावृत्तांत

दिनांक १६/०८/२०१३ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि १६/०८/२०१३ रोजी दुपारी १२.०० वाजता ड प्रभाग कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.सोनाली जम | अध्यक्षा |
| २... | मा.विनोद नढे | सदस्य |
| ३. | मा..कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| ४. | मा.अप्पा पवार | सदस्य |
| ५. | मा.निलेश बारणे | सदस्य |
| ६. | मा.विनय गायकवाड | सदस्य |
| ७. | मा.बापू काटे | सदस्य |
| ८. | मा.रामदास बोकड | सदस्य |
| ९. | मा.राजेंद्ग जगताप | सदस्य |
| १०. | मा.सुनिता वाघेरे | सदस्या |
| ११. | मा.उषा वाघेरे | सदस्या |
| १२. | मा.विमल काळे | सदस्या |
| १३. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| १४. | मा.अनिता तापकीर | सदस्या |
| १५. | मा.विमलताई जगताप | सदस्या |
| १६. | मा.झामाबाई बारणे | सदस्या |
| १७. | मा.स्वाती कलाटे | सदस्या |
| १८. | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १९. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| २०. | मा.शैलजा शितोळे | सदस्या |
| २१. | मा.सुषमा तनपुरे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.व्ही.एम.इंगुळकर, प्रभारी प्रशासन अधिकारी, सभा शाखा मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.एस.एस.चव्हाण, कार्यकारी अभियंता विदयुत, मा.शरद जाधव, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.एम.डी.निकम , कार्यकारी अभियंता, जलनिसारण विभाग,

मा.सोमनाथ परदेशी, उपअभियंता, स्थापत्य, मा.डी.एस.सोनवणे, उपअभियंता,स्थापत्य, मा.एस.डी.पोरेडी, उपअभियंता, स्थापत्य मा.रामनाथ टकले उपअभियंता, स्थापत्य, मा.रविंद्ग पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.दिलीप धुमाळ, उपअभियंता , विदयुत, मा.पी.एस.केदारी, उपअभियंता विदयुत, मा.राजेंद्ग जावळे, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही.एल.चव्हाण सहा आरोग्याधिकारी , मा.बेडाळे, सहा.आरोग्याधिकारी , इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली. तदनंतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रिका क्रमांक ४, दिनांक दिनांक १२/७/२०१३ व दिनांक २६/७/२०१३ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.सदस्य यांचे मागणीप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्र.२ प्रभाग क्र.५६ वैदुवस्तीमधील जवळकर नगर भागातील रस्त्यांना नांवे देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३ प्रभाग क्रमांक ५३ मधील सर्व्हे नंबर २३७/१ कस्पटे वस्ती वाकड येथील चौकांस म्हातोबा चौक कस्पटेवस्ती असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव .

विषय क्र.४ वॉर्ड क्रमांक ६० सांगवी गावठाणमधील रस्त्याला कै.काशिनाथ गोपाळ काची यांचे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५ प्रभाग क्र.५३ मधील वाकड-नाशिकरोड वर ४५ मी.रस्त्यावरुन दक्षिण उत्तर अस्तित्वातील ४ मी.रस्त्याला १२ मी.रस्ता नगररचना अधिनियम २०५ अन्वये घोषित करण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.विनय गायकवाड यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक २१ विषय क्र.१

दिनांक १६/०८/२०१३ विभाग - नगररचना

सुचक - मा.स्वाती कलाटे अनुमोदक - मा.विनय गायकवाड

संदर्भ :- क्र.नरवि/कावि/६/२७४/२०१३, दिनांक १६/७/२०१३ रोजीचा मा.आयुक्त सो . यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहराची विकास योजना सन१९९५ मध्ये महाराष्ट्र शासन निर्णय क्र.टीपीएस-८९३/१२७६/सीआर-१७४/९३/युडी-१३ दिनांक १८ सप्टेंबर १९९५ रोजी मंजूर झालेली आहे. त्यामध्ये मौजे-वाकड येथील स.नं.२६० पैकी मधील जमिन रहिवास विभाग व उर्वरीत हरीत विभागात येत आहे. तसेच स.नं.चा काही भाग मुळा नदीचे नदी ते निळी पुररेषा, निळी पुररेषा ते लाल पुररेषा व उर्वरीत भाग लाल पुररेषेच्या बाहेर येत आहे.

मौजे-वाकड जगताप डेअरी ते बालेवाडी बाणेर या दोन्ही ठिकाणांसाठी जोडणारा मुळा नदीवर पुल बांधल्यास वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागेल त्या ठिकाणी पुणे मनपा व पिंपरी चिंचवड मनपा यांचे संुयक्त विदयमाने पुल बांधणेत यावा अशी मागणी दिनांक ९/७/१२ चे पत्रान्वये मा.आमदार श्री.लक्ष्मण जगताप यांनी केलेली आहे.

मा.आमदार यांचे पत्राचे अनुषंगाने मा.आयुक्त यांचे कार्यालयात दिनांक १३/९/२०१२ रोजी संयुक्त बैठक आयोजित करणेत आलेली होती त्यामध्ये झालेले चर्चेनुसार मौजे-वाकड येथील स.नं.२६० पैकी मध्ये स्मशानभूमीलगत पुलाचे स्थान निश्चित करुन दिनांक २१/९/२०१२ चे पत्रानुसार पुणे मनपाकडून नकाशे प्राप्त झालेले आहेत. सदरचे नकाशावर या विभागाने ३० मी. रुंदीचा रस्ता मार्क करुन दिनांक ५/१०/२०१२ रोजी कार्यकारी अभियंता ड मुख्यालय स्थापत्य यांचेकडे नकाशे पाठविलेले होते. सदरचे नकाशाची तपासणी करुन दिनांक ८/१०/२०१२ रोजीचे पत्रानुसार कार्यकारी अभियंता यांनी सदरचे रस्त्याची रुंदी ३५ मी. करोबाबत मागणी केलेली आहे.

तथापि सदर ठिकाणी मनपाचे मंजूर विकास योजनेंत प्रस्तावित रस्ता दाखविलेला नाही त्यामुळे वाहतुकीचे नियोजनाचे दृष्टीने व पुणे मनपानेही त्यांचे हददीत रस्ता व पुल करण्याची तयारी दर्शविल्याने मौजे-वाकड येथील स.नं.२६० पैकी मध्ये मुळा नदीवरील नियोजित पुलाकरीता विकास योजनेव्यतिरिक्त मुळा नदीपासून ४५.० मी. रुद रस्त्यापर्यंत ३५.० मी. रुंद रस्ता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये म्युनिसिपल रोड रस्ता घोषित करणे आवश्यक आहे. सदरचा रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये घोषित करणेकामी प्रस्ताव मा.ड प्रभाग समिती सभेपुढे मंजूरीसाठी ठेवणेत आलेला होता. प्रस्तुतचे प्रस्तावास ठराव क्र.५८ दिनांक ८/२/२०१३ नुसार मा.ड प्रभाग समितीने मान्यता दिलेली आहे.

सदर रस्त्यासाठी नागरीकांचे हरकती व सुचना मागविणेकरीता टाईम्स ऑफ इंडिया व दैलोकमत मध्ये दिनांक ३१/३/२०१३ रोजी जाहीर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती त्या अनुषंगाने श्री.दत्तात्रय मानकर यांनी दिनांक ३०/४/२०१३ चे पत्रान्वये हरकत घेतलेली आहे. सदरबाबत दिनांक १५/५/२०१३ रोजी संबंधीत हरकतधारक यांना सुनावणी देणेत आलेली आहे व त्यामध्ये त्यांना जागेचा मोजणी नकाशा व मालकी हक्काची कागदपत्रे १५ दिवसांत सादर करण्याबाबत सांगणेत आलेले होते परंतु अदयापही त्यांनी कागदपत्रे सादर केलेली नाहीत अथवा या कार्यालयाशी संपर्क साधलेला नाही. इकडील दिनांक २९/६/२०१३ चे पत्रान्वये सादर हरकतदारास अंतिम कळविणेत आलेले आहे.

सदरचा रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये अंतिम घोषित करणेकामी मा.ड प्रभाग समितीची मंजूरी आवश्यक आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २२ — विषय क्र.२
दिनांक १६/०८/२०१३ — विभाग - स्थापत्य
सुचक - मा.वैशाली जवळकर — अनुमोदक -मा.सुनिता वाघेरे

संदर्भ :- मा.वैशाली जवळकर यांचा दि.१६/८/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

वॉर्ड क्रमांक ५६ वैदुवस्ती जवळकरनगर येथे पुढे नमुद केल्याप्रमाणे १) प्रितम प्रकाश प्लॉझा अपार्टमेंट जवळकरनगर पिंपळेगुरव अपार्टमेंटच्या उत्तरेकडील रस्त्याला (नदीकडे पुर्वेला) जाणा-या रस्त्याला त्रिमुर्ती कॉलनी जवळकरनगर असे नांव देण्यास तसेच २) प्रभा अपार्टमेंट जवळकरनगर पिंपळेगुरवच्या दक्षिणेकडील रस्त्याला श्री कृष्ण मंदिर मार्ग क्र.१ जवळकरनगर व प्रभा अपार्टमेंट जवळकरनगर पिंपळेगुरवच्या उत्तरेकडील रस्त्याला श्री कृष्ण मंदीर मार्ग क्र.२ जवळकरनगर असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २३ — विषय क्र.३
दिनांक १६/०८/२०१३ — विभाग - स्थापत्य
सुचक - मा.विनय गायकवाड — अनुमोदक -मा.बापू काटे

संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचा दि.१६/८/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५३ मधील सर्व्हे नं.२३७/१ कस्पटे वस्ती वाकड येथील चौकास म्हातोबा चौक , कस्पटेवस्ती असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २४ विषय क्र.४

दिनांक १६/०८/२०१३ विभाग - स्थापत्य

सुचक - मा.सोनाली जम अनुमोदक -मा.सुनिता वाघेरे

संदर्भ :- मा.सोनाली जम यांचा दिनांक १६/८/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

कै.काशिनाथ गोपाळ काची हयांनी आपले संपुर्ण आयुष्य दापोडी ते पिंपळेगुरव नदीवर नावाडयाचे काम करुन नागरीकांची सेवा करीत संपुर्ण आयुष्य खर्ची केले असल्यामुळे सांगवी गावठाण मधील वॉर्ड क्र.६० मध्ये एस टी कॉलनी शेजारील रोडला कै.काशिनाथ गोपाळ काची यांचे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक २५ विषय क्र.५

दिनांक १६/०८/२०१३ विभाग ज्ञ नगररचना

सुचक - मा.विनय गायकवाड अनुमोदक -मा.बापू काटे

संदर्भ :- मा.विनय गायकवाड यांचा दि.१६/८/२०१३ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५३ मधील वाकड-नाशिकरोड वर ४५ मी. रस्त्यावरुन दक्षिण उत्तर अस्तित्वातील ४ मी.रस्त्याला नगररचना अधिनियम २०५ घोषित करण्याबाबत स.नं.२६२/१/अ, २६२/२अ, २६२/१ब, २६२/२ब मधून २०५ रस्ता घोषित करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे प्रकट केले.

सही/ -
सोनाली जम
अध्यक्षा
ड प्रभाग ामिती,पिंचिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे ज्ञ १७

सही/ -
प्रशासन अधिकारी सभा शाखा
ड प्रभाग समिती ,पिंचिं.म.न.पा.,
रहाटणी, पुणे - १७

जा.क्र.ड/सभा/कावि/२३/२०१३
दिनांक ०५ / ०९/२०१३
प्रति,
मा.श्री./श्रीमती -----------------------
सदस्य / सदस्या ड प्रभाग समिति,
पिं परी चिं चवड महानगरपालिका